कावेरी कॉलेजात सायबर सुरक्षेबाबत मिळाले मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' या अभियानाअंतर्गत आयोजित उपक्रमात कावेरी कला-विज्ञान-वाणिज्य महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्सनी सहभाग नोंदवला. क्विक हील फाउंडेशन, पुणेतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. यात अजय शिर्के, दीपू सिंग, गायत्री केसकर यांनी मार्गदर्शन केले. 'माझा डेटा, माझी जबाबदारी' या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना समाजात जनजागृती मोहिमांचे नेतृत्व करण्यास आणि सुरक्षित डिजिटल पद्धतींचा प्रसार करण्यासही सक्षम करेल. अनुपमा काटकर यांच्या हस्ते हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. यापुढे प्रा. चैत्रा उचिल आणि 'सायबर वॉरियर क्लब'चे अवनीश अमित किटकूले, रिचा संजय गुप्ता, प्रणव गोरख जोरी, सुहानी संजय मौर्य ही टीम उपक्रमांचे नेतृत्व करेल.उपप्राचार्य डॉ. आनंद बुद्धिकोट यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले.